करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे

संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४३ | पाने-१२ | दि.८/११/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

# विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा उडाला धुराळा

## मुख्यमंत्री शिंदे यांची करमाळ्यात तर राष्ट्रवादीच्या अध्यक्षाची रोपळे येथे सभा






करमाळा : विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा जोरदार धुराळा उडाला असून, अनेक गावातून पाठींबे आणि सभांचा धडाका सुरू झाला आहे. महायुतीकडून शिवसेनेचे उमेदवार दिग्विजय बागल हे उभे असून त्यांच्या प्रचारासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करमाळा येथे सभा घेतली. तर महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण (आबा) पाटील यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी रोपळे येथे सभा घेतली आहे.

विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांना पाठींबा देणाऱ्या सभा वेगवेगळ्या ठिकाणी संपन्न झाल्या आहेत. चौरंगी लढतीतील अपक्ष उमेदवार प्रा.रामदास झोळ यांनी होम टू होम प्रचाराचा धडाका लावला आहे. सध्याच्या स्थितीत पदयात्रा, जाहीर सभा आणि कॉर्नर सभा यावर नेत्यांचा भर आहे. शिवसेनेचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्यासाठी महायुतीचे पदाधिकारी प्रचारासाठी येत आहेत. याचप्रकारे महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण आबा पाटील यांचेकरीता माजी आमदार जयवंतराव जगताप यांचेसह अन्य पदाधिकारी हिरीरिने भाग घेत आहेत. शरद पवार हेही १७ नोव्हेंबरला येणार असल्याचे समजले आहे. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी प्रचाराची धुरा आपल्याच कार्यकर्त्यांच्या खांद्यावर ठेवत गावभेट दौरा पुर्वी करून आता गावागावातून मेळावे व सभांचे आयोजन केले जात आहे. बाहेरील व्यक्तींच्या सभा नसल्याने संजयमामा शिंदे यांना प्रचारासाठी भरपूर वेळ मिळत असून त्यादृष्टीने त्यांनी घराघरापर्यंत जाण्याचे नियोजन केले आहे. अन्य अपक्ष उमेदवारांनी प्रचारापेक्षा इतरांचा प्रचार पाहण्यावरच लक्ष केंद्रीत केल्याचे दिसते. एकंदरीत चौरंगी लढतीत जोरदार प्रचार सुरू झाल्याचे सर्वत्र जाणवत आहे.




२४४, करमाळा-माढा विधानसभा निवडणूक २०२४

अपक्ष उमेदवार

प्रा.रामदास मधुकर झोळ

नमस्कार.., मी **प्रा.रामदास मधुकर झोळ** करमाळा-माढा विधानसभेसाठी **अपक्ष** म्हणून **रिक्षा** या चिन्हावर निवडणूक लढवत आहे. मतदार संघातील बंधू-भगिणींनो मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी, युवा पिढीच्या उज्वल भविष्यासाठी, महिला सशक्त करण्यासाठी, आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी, शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी, गरजवंतांच्या आरक्षणासाठी या परिवर्तनाच्या लढाईत चला एकत्र येऊ, परिवर्तन करू !

येणाऱ्या २० तारखेला मतदार बंधू भगिणींनो.., **रिक्षा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विजयी करावे** आणि आपल्या मतदार संघाला सुजलाम, सुफलाम बनवण्याची संधी द्यावी; अशी नम्र विनंती !




११ | रामदास मधुकर झोळ | ऑटो रिक्शा

चला.. एकत्र येऊ
प्रा.रामदास झोळ
सरांना साथ देऊ..!

प्रकाशक : रविंद्र गोडगे

राजकारणात बदलत्या परिस्थितीनुसार याग्य निर्णय घेतलेतर यश मिळते.

## संपादकीय..........................................!

# चौरंगी लढतीत बेरीज-वजाबाकी !

करमाळा विधानसभा मतदार संघात छाननीनंतर ३१ उमेदवारांचे अर्ज कायम राहिले होते. ४ नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी १६ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यानंतर १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले. यामध्ये दोन उमेदवार माढा तालुक्यातील तर १३ उमेदवार करमाळा तालुक्यातील आहेत. यात माढा तालुक्यातील धिरज कोळेकर व विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांचे उमेदवारी अर्ज राहिले आहेत. तर करमाळा तालुक्यातील महाविकास आघाडीचे नारायण आबा पाटील, महायुतीचे दिग्विजय बागल, अपक्ष प्रा.रामदास झोळ यांचेसह बसपाचे संजय वामन शिंदे, न्यु राष्ट्रीय समाज पार्टीचे अशोक ज्ञानदेव वाघमोडे, अपक्ष सिध्दांत वाघमारे, ॲड.जमीर शेख, जालिंदर कांबळे, गणेश भानवसे, मधुकर मिसाळ, विनोद सितापुरे (दाळवाले), अभिमन्यु अवचर आणि संजय लिंबराज शिंदे हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. असे असलेतरी होणारी लढत ही चौरंगी आहे. या चौरंगी लढतीतही तीन उमेदवार अत्यंत जोशात कार्यरत आहेत. या तीन उमेदवारात म्हणजे विद्यमान आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार नारायण आबा पाटील व शिवसेनेचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्यात बेरीज-वजाबाकीचे राजकारण जोरात सुरू आहे. यात बदलते कार्यकर्ते हेच निवडणुकीच्या विजयाचे गणित घडविणार की बिघडविणार.. हे २३ नोव्हेंबरला समजणार आहे.

सन २०१९ च्या निवडणुकीत विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांचे सोबत जगताप गटाचे नेते माजी आमदार जयवंतराव जगताप व त्यांचा गट होता. त्याचप्रमाणे करमाळा शहरातील सावंत बंधू, ॲड.राहुल सावंत, माजी नगरसेवक संजय सावंत व काँग्रेसचे युवा नेते सुनील सावंत हे ही शिंदे यांचे सोबत कार्यरत होते. यावेळी या दोन्ही गटांनी शिंदे यांना डावलत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे उमेदवार नारायण आबा पाटील यांना पाठींबा दिला आहे. ही बाब लक्षात येताच, आमदार संजयमामा शिंदे यांनी बेरजेचे राजकारण सुरू केले. त्यांनी यावेळी ३६ गावातील १० उमेदवारा पैकी ८ उमेदवारांचे अर्ज मागे घेवून एक दमदार पाऊल उचलले आहे. विशेष म्हणजे यात मनसेचे सागर लोकरे (पिंपळखुंटे), निवृत्ती पाटील (बारलोणी), जितेंद्र गायकवाड (कुर्डूवाडी), संजय विठ्ठल शिंदे (चिंचगाव), संभाजी भानुदास उबाळे (म्हैसगाव), शहाजान शेख (कुर्डूवाडी) आणि सर्वात महत्वाचे म्हणजे गेल्यावेळी ज्यांनी वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवली होती व त्यांनी ४४६८ मते घेतली होती असे अतुल खुपसे-पाटील यांनीही माघार घेतली आहे. यामुळे शिंदे यांनी ३६ गावातील डॅमेज दुरूस्त केले आहे. त्यानंतर करमाळा शहरातील भाजपा नेते गणेश चिवटे, रामा ढाणे, जगदीश आगरवाल, महादेव फंड तसेच रिपाइंचे नेते नागेश कांबळे, माजी नगराध्यक्ष दिपक ओहोळ, विजयराव पवार, मनसेचे संजय घोलप व त्यांचे सहकारी या मंडळींना आपल्याकडे घेऊन बेरजेचे राजकारण केले आहे.

दरम्यान माजी आमदार नारायण पाटील यांनीही मागच्या वेळेस बागल गटाकडे असणारे संतोष वारे, शिवसेनेचे सुधाकर लावंड, कंदरचे भास्कर भांगे, वीटचे राजेंद्रसिंह राजेभोसले, बारामती ॲग्रोचे सुभाष गुळवे, मकाई कारखान्याचे माजी अध्यक्ष आप्पासाहेब झांजुर्णे या मंडळींनाही आपल्याबरोबर आणून बेरजेचे राजकारण केले आहे.

विशेष म्हणजे बागल गटाने ऐनवेळी निवडणुकीत उडी घेतली. एवढेच नव्हेतर युवा नेते दिग्विजय बागल यांना भाजपा ऐवजी शिवसेनेची उमेदवारी मिळून एक नवा पर्याय मतदारांसमोर उभा केला आहे. यावेळी बागल यांना भाजपा, राष्ट्रवादी व शिवसेनेचे कार्यकर्ते मिळाले आहेत. यात महेश चिवटे, दिपक चव्हाण, किरण बोकन, विठ्ठलराव भणगे, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, जयकुमार कांबळे, संजय शिलवंत अशी मंडळी आपल्या सोबत घेऊन बेरजेचे राजकारण केले आहे. एकंदरीत या तिघा उमेदवारात कार्यकर्त्यांना मिळविण्याच्या दृष्टीने जोरदार रस्सीखेच सुरू आहे. ग्रामीण भागातील दुसऱ्या फळीतील अनेक कार्यकर्ते सध्याच्या स्थितीत स्थिर आहेत. १५ नोव्हेंबर नंतर या दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांना फेविकॉल लावले जाईल आणि त्यानंतर कोणता गट मोठा.. याचे चित्र जनतेसमोर स्पष्ट होईल.

असे असलेतरी तालुक्यातील मतदार हा कार्यकर्त्यांच्या सुचनावर मतदान करत नाही; हे उघड आहे. सोशल मिडीयाचा मतदारांवर मोठा प्रभाव असून अनेक घडामोडी ते पाहून, ऐकून, वाचून आपले मत नक्की करतात. हे करमाळा तालुक्यासाठी असलेतरी माढा तालुक्यातील ३६ गावे या निवडणुकीचे पारडं फिरविण्याचं काम करतात. या ३६ गावातील मतदारांपैकी जो करमाळा तालुक्यातील उमेदवार जास्त मते खेचू शकतो; तोच विजयी होवू शकतो. जर करमाळा तालुक्यातील उमेदवाराची जादू ३६ गावात चालली नाहीतर विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा संधी मिळू शकते.

सध्याच्या स्थितीत मराठा आरक्षण हा महत्वाचा मुद्दा असून या मुद्यावर प्रा.रामदास झोळ किती मतदान मिळविणार, यावरही विजयाचे गणित आखले जावू शकते. झोळ यांना मराठा मतदारांची पसंती मिळाल्यास महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या विजयाचा मार्ग खुला होवू शकतो. याशिवाय शिवसेनेचे उमेदवार हे कोऱ्या पाटीचे उमेदवार असून यावेळी लाडक्या बहिणीचा आशिर्वाद त्यांना मिळालातर त्यांचाही विजयाचा मार्ग खुला होवू शकतो.

एकंदरीत या विधानसभा निवडणुकीत बेरीज - वजाबाकीचे राजकारण मोठ्या प्रमाणात झाले असून ज्याची जास्त बेरीज, तो उमेदवार विजयी होणार हे उघड आहे.

## बेकायदेशीर देशी दारू विक्रेत्यावर कारवाई ७३७० रूपयाचा माल जप्त

करमाळा(सं.प्र.) : भिलारवाडी येथे बेकायदेशीर देशी-विदेशी दारू विक्री करणाऱ्यावर करमाळा पोलीसांनी छापा टाकून त्याच्या जवळून ७३७० रूपयाची दारू जप्त केली आहे. हा प्रकार १ नोव्हेंबरला दुपारी सव्वातीन वाजता हॉटेल मल्हारच्या जवळ घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मनजीत संजय भोसले यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. भिलारवाडी येथे बेकायदेशीर देशी-विदेशी दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यावर आम्ही येथे दुपारी ३ वा. २५ मि. छापा टाकला असता, अशोक आजिनाथ डोळे रा.भिलारवाडी याच्याकडे ७३७० रूपयाचा माल म्हणजे ७० संत्रा देशी दारू १३ रॉयल टॅग कंपनीच्या दारू बाटल्या सापडल्या आहेत. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.


## अज्ञात वाहन व मोटारसायकलच्या झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वाराचे निधन

करमाळा : अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक देऊन झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील मांगी येथील संजय श्रीरंग शिंदे(वय-४९) यांचे निधन झाले आहे. हा अपघात ३१ ऑक्टोबरला दुपारी साडेचार वाजता बायपास रोडवर झाला आहे. या प्रकरणी अजय संजय शिंदे रा.मांगी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. ३१ ऑक्टोबरला दुपारी साडेचार वाजता माझे वडील संजय श्रीरंग शिंदे हे बॉक्सर मोटारसायकलवरून नालबंद मंगल कार्यालयकडून बायपास रोडने जामखेड नाक्याकडे जात असताना पाठीमागून आलेल्या पांढऱ्या रंगाच्या बोलोरो जीपने त्यांना जोराची धडक दिली. ते गंभीर जखमी असताना त्यांना दवाखान्यात न नेता जीपचालक परस्पर निघून गेला. त्यानंतर आम्हाला समजल्यावर आम्ही त्यांना दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याचे सांगितले. या प्रकरणी पोलीसांनी अज्ञात बोलोरो चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक टिळेकर हे करत आहेत.

सा.कमलाभवानी
संदेश
वार्षिक वर्गणी २०० रू.
भरून घरपोच अंक मिळवा

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली
## टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

• **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा

• **काशी दर्शन** काशी, गया, आयोध्या, प्रयाग

• **गुजरात दर्शन** गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेयु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
सहल खर्च : रू.१४,०००

• **कन्याकुमारी दर्शन** कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

• **गंगासागर दर्शन** गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

• **केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
सहल खर्च : रू.३१,५००

• **वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन** माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
सहल खर्च रू.२६,०००

• **वैष्णोदेवी दर्शन** माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

• **मथुरा दर्शन** मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
सहल खर्च : रू.९,१००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



संपर्क
**श्री.मयुर राऊत**
**बुकींग सुरू**
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

# प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने क्षयरूग्णांना पोषण आहाराचे वाटप



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील दोन रूग्णांना प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने दत्तक घेऊन सहा महिन्याच्या पूर्ण कालावधीसाठी निक्षय मित्र या नात्याने पोषण आहाराचे संस्थेचे अध्यक्ष रामदास कांबळे, वैद्यकिय अधिक्षक डॉ.गुंजकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ.गुंजकर यांनी संस्थेने रूग्णालयातील रूग्णांना पोषण आहार वाटप केल्याबद्दल पुढील सामाजिक कार्यासाठी उपजिल्हा रूग्णालय सदैव आपल्याला सहकार्य करेल;असे सांगितले. पोषण आहारा-आहारासाठी सद्गुरू कृपा फर्निचरचे मालक गणेश तळेकर व प्रशांत पाटुळे यांनी सहकार्य केले. यावेळी श्रीहरी ढावरे, अलिम शेख, नरेंद्र ठाकूर, शिवनाथ घोलप, डॉ.राऊत, चव्हाण, विभुते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष रामदास कांबळे यांनी केले. आभार श्रीहरी ढावरे यांनी मानले.

# विवान गरड याची राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड



करमाळा(सं.प्र.): भारत हायस्कुल, जेऊर चा विद्यार्थी आणि ग्रामपंचायत सदस्य विनोद गरड यांचे सुपुत्र विवान विनोद गरड याची छत्तीसगढ येथे होणाऱ्या १४ वर्ष मुले राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल माजी आमदार व संस्थेचे अध्यक्ष नारायण पाटील, उपाध्यक्ष तथा माजी सरपंच अनिलकुमार गादीया, सचिव प्रा.अर्जुनराव सरक, लोकनियुक्त सरपंच पृथ्वीराज पाटील, मुख्याध्यापक ए.जी.सरोदे, उपमुख्याध्यापक एन.डी.कांबळे, पर्यवेक्षक बी.एस.शिंदे यांनी विवान याचे विशेष अभिनंदन केले. विवान यास क्रिडा शिक्षक जी.आर.पाटील, बी.सी. सरक, डी.बी.वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !**
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट

## उपवासाचे पदार्थ

**रेडिमेड स्नॅक्स**
• खजुर (लाल व काळी)
• सिडलेस खजुर (लाल व काळी)
• राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
• गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
• गुलकंद राजगिरा वडी व रोल
• नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
• केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
• बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
• बटाटा चिलीमिली
• बटाटा चिवडा (गोड व तिखट)
• राजगिरा लाही
• गावरान खारे शेंगदाणे
• भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
• तिखट शेंगदाणे
• लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
• उपवास शाबुदाणा खाकरा
• उपवासाचे गोड लिंबू लोणचे
• शेंगतेल
• शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
• शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
• इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
• पॅकींग सायकल भगर
• राजगिरा इ.



**काटदरे उपवास पीठ**
• राजगिरा पीठ
• उपवास भाजणी पीठ
• शिंगाडा पीठ
• सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)

**तळण्यासाठी कच्चे पदार्थ**
• कच्चा नायलॉन शाबुदाणा
• बटाटा पापड
• बटाटा - भगर पापड
• बटाटा व शाबुदाणा
• रंगीत पापडी
• शाबुदाणा पापडी
• बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
• बटाटा खिस
• बटाटा शेव, बटाटा स्क्रु
• शाबुदाणा बॉबी

*टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
# एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू.

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अॅन्ड स्वीटस् । बेकरी अॅन्ड मिल्क प्रॉ
नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# एकदाही आमसभा न घेणारे शिंदे हे निष्क्रीय आमदार : अर्जुनराव गाडे

करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील रस्ते, आरोग्य, वीज, सिंचन यासारखे प्रश्न लोकप्रतिनिधीच्या अनास्थेमुळे जसेच्या तसे असून त्यामुळे सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी एकदाही आमसभा न घेणारे संजयमामा शिंदे हे सर्वात निष्क्रीय आमदार आहेत; असे मत आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव गाडे यांनी व्यक्त केले.

शिवसेनेचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना गाडे म्हणाले, की शामलताई बागल या आमदार असताना दहिगाव उपसा सिंचन योजनेचे काम अंतिम स्वरूप घेत असताना नारायण पाटील यांनी दहिगाव येथील नातेवाईकांना हताशी धरून ९०० मीटर जलवाहिनीचे काम अडवून ठेवले. त्यामुळे दहिगाव योजना रखडली. अन्यथा ही योजना मागील दहा ते बारा वर्षापूर्वी सुरू होऊन दहा वर्षापूर्वीच पूर्व भागाचे नंदनवन झाले असते. शामलताई बागल यांनी टेंभूर्णी-जातेगाव मार्गाला मंजुरी मिळवून दिली प्रत्यक्ष काम सुरू झाले. परंतु २०१४ ला सत्ता बदल झाला आणि त्यानंतरच्या आमदारांनी स्वत:चे व कार्यकर्त्यांचे टीपर, पोकलेन कामावर घ्या, पैशांसाठी दबाव निर्माण करण्यात आला. त्यामुळे संबंधित कंपनीने काम सोडले. परिणामी तेव्हापासून आजपर्यंत या मार्गावर १९८ जणांना अपघातात जीव गमवावा लागला. त्यामुळे करमाळा विधानसभा मतदारसंघाचा विकास करण्यासाठी महायुतीचे अधिकृत उमेदवार दिग्विजय दिगंबरराव बागल यांना विधानसभेत पाठवणे हेच आपले लक्ष्य असल्याचे अर्जुनराव गाडे यांनी सांगितले.

## हिवरे येथे आ.शिंदे गटाला धक्का
# असंख्य कार्यत्यांचा दिग्विजय बागल यांचे उपस्थितीत महायुतीत प्रवेश



करमाळा (सं.प्र.): हिवरे येथील आमदार संजयमामा शिंदे यांच्या गटाला धक्का बसला असून महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्या उपस्थितीत हिवरे येथील रावसाहेब पाटील, अशोक ओहोळ, गजेंद्र फरतडे, अरूण पाटील, रामहरी पाटील, दादासाहेब पाटील, गणेश पाटील, अजित पाटील, भैरू निंबाळकर, मच्छिंद्र फरतडे, गोरख फरतडे, ओंकार निंबाळकर, सोमनाथ फरतडे, ब्रह्मदेव फरतडे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिंदे गटाला रामराम ठोकत महायुतीला साथ देण्याचा निर्णय घेतला. यावेळी प्रवेश केल्या कार्यकर्त्यांनी सांगितले, की भाजपा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या नेतृत्वाखाली दिग्विजय बागल यांना जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. यावेळी चिंतामणी जगताप, सतीश नीळ, तात्यासाहेब फरतडे, कमलाकर फरतडे तसेच महायुतीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.


# समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

**उपलब्ध सुविधा..** ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक

**महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)**

● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator

**गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)**


## श्री कमलादेवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने
# गरजू महिलांना साड्या व स्टीलचा डबा वाटप




करमाळा(सं.प्र.) : दिपावली पाडव्यानिमित्त श्री कमलादेवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्रीराम प्रतिष्ठान संचलित अन्नपूर्णा योजना येथील गरजू महिलांना साडी व जेवणाच्या स्टीलच्या डब्याचे वाटप सचिव अनिल पाटील, विश्वस्त सुशील राठोड, व्यवस्थापक अशोक गाठे, पुजारी कमलाकर सोरटे, रेणुका अशोक गाठे यांचे हस्ते करण्यात आले. तसेच सर्वोदय प्रतिष्ठान व क्रिएटिव्ह प्रतिष्ठान तर्फे मंदिरामध्ये भव्य-दिव्य अशी रांगोळी काढण्यात आली. यावेळी कमलादेवी मंदिर जीर्णोध्दाराच्या कामासाठी भानुदास काळे (करमाळा) यांचेकडून ५१ हजार रूपये देणगी व ताराबाई रामचंद्र क्षीरसागर यांचेकडून ११ हजार रूपये देणगी, आदित्य संजय ढाणे यांचेकडून १० हजार रूपये देणगी, हरीचंद्र घाडगे (सालसे) यांचेकडून २१०० रूपये देणगी, सुधाकर ओंभासे गुरूजी यांचेकडून १००१ रूपये देणगी प्राप्त झाली. या सर्वांचे सत्कार मंदिर समितीकडून करण्यात आले.

यावेळी कमलादेवी मंदिर समितीचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सचिव अनिल पाटील, विश्वस्त सुशील राठोड, ॲड.शिरीष लोणकर, राजेंद्र वाशिंबेकर, ओंकार पुजारी, दादासाहेब पुजारी, तुषार सोरटे, सहदेव सोरटे, पुरोहित सुशील पुराणिक, पद्माकर सुर्यपुजारी, पांडूरंग पवार, चंद्रकांत चुंबळकर व भक्तगण उपस्थित होते.


# प्रियंका आय केअर हॉस्पीटल

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

**उपलब्ध सुविधा...** डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

**आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर**



# साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.



# चिवटे उपहारगृह

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सॅंडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

एकवेळ अवश्य भेट द्या..!

**राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६**

# शिवसेना उपतालुका प्रमुख पदी सचिन सरडे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शिवसेना तालुका उपप्रमुख पदी करंजे येथील सचिन शिवाजी सरडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच युवा सेना शहर समन्वयक पदी पवन घोलप यांची तर पोथरे पंचायत समिती गटप्रमुख पदी पप्पू मच्छिंद्र सरडे यांची निवड करण्यात आली आहे; अशी माहिती जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली. यावेळी उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील, तालुका प्रमुख राहुल कानगुडे, शहरप्रमुख संजय शिलवंत, युवा उपजिल्हाप्रमुख नवनाथ गुंड, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख ज्योतीताई शिंदे, शहरप्रमुख किर्ती स्वामी, पद्मजा इंगवले आदी पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेना मजबूत करण्यासाठी करमाळा तालुक्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून दिग्विजय बागल यांना आमदार व एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांनी एकजुटीने काम करावे; असे आवाहन विधान-सभा संपर्कप्रमुख रवी आमले यांनी केले.

# श्री कमलादेवी मंदिराच्या कामासाठी नारायण बोबे यांची २१ हजाराची देणगी



करमाळा(सं.प्र.) : श्री कमलादेवी मंदिर जतन व संवर्धन कामास गेल्या दहा महिन्यांपासून सुरूवात करण्यात आली आहे. मंदिर जतन संवर्धनाचे काम प्रगतीपथावर असून ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सचिव अनिल पाटील व सर्व विश्वस्त यांनी मदतीचे आवाहन भक्तांकडे केले होते. या आवाहनास प्रतिसाद कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक नारायण बोबे यांचेकडून २१ हजार रूपयाची देणगी तसेच जामखेड येथील संदीप महादेव टापरे यांचेकडून १० हजार रूपये व ऑनलाईन १ हजार रूपये अशी देणगी प्राप्त झाली आहे. देणगी देणाऱ्यांचा सत्कार ट्रस्टच्या वतीने व्यवस्थापक अशोक गाठे, लक्ष्मण हवालदार, रघुनाथ खटके यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी श्री कमलाभवानी मंदिर जीर्णोध्दाराच्या कामासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन देखील करण्यात आले.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत




त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स्, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या, नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला
संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात खुशखबर
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# करमाळा तालुक्यात आमदार शिंदे यांना वाढता पाठींबा



करमाळा(सं.प्र.): करमाळा विधानसभा निवडणुकीमध्ये दिवसेंदिवस चुरस निर्माण झालेली असून सुरूवातीला बॅकफुटला गेलेला आमदार संजयमामा शिंदे गट आता फ्रंटफुटला आलेला आहे. दिवसेंदिवस आमदार शिंदे गटाला विविध कार्यकर्त्यांसह पक्षांचा, संघटनांचा पाठींबा वाढू लागला आहे. ८ नोव्हेंबरला रिपाइंचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नागेश कांबळे यांनी कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन विधानसभा निवडणुकीत आपण महायुती व महाविकास आघाडीला धडा शिकवणार असून दलित समाजाची संपूर्ण ताकद आमदार संजयमामा शिंदे यांच्या पाठीशी उभी करणार असल्याचे सांगितले. तसेच या निवडणुकीमध्ये दलित समाज किंगमेकरची भुमिका पार पाडणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच ९ नोव्हेंबरला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे केमिस्ट भवन येथे आपल्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करून त्यामध्ये करमाळा तालुक्याच्या विकासासाठी आ.शिंदे हेच एकमेव पर्याय असल्यामुळे अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांना पाठींबा देण्याचा निर्णय घेतला. यावेळी मनसेचे संजय घोलप व त्यांचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यापूर्वीच जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य गणेश चिवटे यांनीही आपला पाठींबा जाहीर केलेला आहे. लवकरच ते मोठा मेळावा घेऊन पाठींबा जाहीर करणार आहेत. राष्ट्रीय समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी हे सुध्दा पाठींबा देण्याच्या विचारात आहेत. दिवसेंदिवस आ.शिंदे यांच्या कॉर्नर सभा व जाहीर सभेमध्ये लोक उत्स्फुर्तपणे सहभागी होत असून त्यांचा वाढता पाठींबा विरोधकांची डोकेदुखी ठरणार आहे.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !



२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# ओजस्वी

लॉन्स & मंगल कार्यालय



स्थळ : वरकटणे, ता.करमाळा.



आशिर्वाद



आशिर्वाद



# शुभारंभ व उद्घाटन

मातोश्री

**श्रीमती सुरेखा रामदास देवकर**

यांचे शुभहस्ते

**रविवार दि.१०/११/२०२४ रोजी**

**सकाळी ११ वा. ४५ मि.**

संपन्न होणार आहे. तरी आपण सहकुटूंब सहपरिवार उपस्थित रहावे; ही नम्र विनंती !

आपले नम्र

**समस्त देवकर परिवार**

वरकटणे, ता.करमाळा.

सर्व सोयीसुविधांयुक्त असे मंगल कार्यालय आपल्या सेवेसाठी हजर..!
आजच बुकींग करा..!



# भावपूर्ण श्रध्दांजली

सर्वांना हसवणाऱ्या तुम्ही
आज आम्हांस रडवून गेलात ।
तुमच्या विना नवभारत स्कूल मध्ये
एक खूप मोठी पोकळी निर्माण झाली ।
तुमच्या सोबत घालवलेल्या क्षणांना
आम्ही कधीही विसरू शकणार नाही ।

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित
नवभारत इंग्लिश मेडियम स्कुलच्या मुख्याध्यापिका

**सौ.सुनिता नागेश मोहिते**

या उपचारादरम्यान अनंतात विलीन झाल्या.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची प्रार्थना
तुमच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

कन्हैयालालजी देवी, सौ.सुनिता कन्हैयालाल देवी, अमोदजी संचेती, चंद्रकांतजी देवी, विजयकुमार दोशी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

**• नवभारत इंग्लिश मेडियम स्कुल, करमाळा •**


13 Nov
सोलापूर जिल्हा परिषदेचे
माजी उपाध्यक्ष व चिखलठाण
गावचे कार्यकुशल नेतृत्व
मा.श्री. राजेंद्रकुमार बारकुंड यांना
वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
डॉ.भूषण राजेंद्रकुमार बारकुंड
(एम.बी.बी.एस.मुंबई)
चि.युवराज राजेंद्रकुमार बारकुंड
शुभेच्छुक
• जाणता राजा मित्र मंडळ
• विविध कार्यकारी सेवा सह. संस्था मर्या; चिखलठाण


हार्दिक अभिनंदन !
आदित्य श्रीधर गायकवाड
भारती श्रीधर गायकवाड
गुळसडी येथील आमचे मित्र श्रीधर गायकवाड यांची कन्या
कु.आरती श्रीधर गायकवाड
यांची B.D.S. प्रवेशासाठी
चि.आदित्य श्रीधर गायकवाड
यांची M.B.B.S. साठी निवड झाल्याबद्दल दोघांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
गुरु माऊली बहुउद्देशीय संस्था संचलित
मातोश्री वृध्दाश्रम, पांडे
• संस्थापक •
बाळासाहेब गोरे गुरूजी


भावपूर्ण श्रध्दांजली
मनी होता भोळेपणा
कधी न दाखविला मोठेपणा
चेहरा होता सदा हसतमुख
सर्वांना दिला आनंद खूप,
अजुनी होतो भास
तु आहेस आमच्या आसपास
शांती लाभो तुझ्या आत्म्यास
हीच आमची ईश्वर चरणी प्रार्थना !
तुझ्या स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली
दशक्रिया विधी : शनिवार, दि.९/११/२०२४ रोजी
सकाळी संगोबा येथे सीना नदीच्या तीरावर होणार आहे..!
शोकाकुल
समस्त वीर, जगताप परिवार करमाळा.

# दोन्ही घरचा पाहुणा उपाशीच राहणार : सुनील तळेकर

करमाळा(सं.प्र.) : दोन्ही घरचा पाहुणा उपाशीच राहणार, करमाळ्या बरोबर माढा तालुक्यातील ३६ गावेही संजयमामांना नाकारणार; असा हल्लाबोल पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी केला माजी आमदार तथा महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण आबा पाटील यांच्या गावभेट दौऱ्याप्रसंगी तळेकर बोलत होते

पुढे बोलताना तळेकर म्हणाले, की महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांना करमाळा विधानसभा मतदार संघात प्रचंड पाठींबा मिळत आहे. अनेक गावी पदाधिकारी आपल्या कार्यकर्त्यांच्या समवेत नारायण पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश करत आहेत. तर दुसरीकडे मात्र विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांच्या विरोधात करमाळा तालुक्याप्रमाणेच माढा तालुक्यातील ३६गावातही नाराजीचा मोठा सुर उमटताना बघायला मिळत आहे. या भागातील मतदार हे सोशल मिडीयावर विद्यमान आमदारांच्या निष्क्रियतेबद्दल बोलत आहेत. विद्यमान आमदार शिंदे हे ३६गावात गेल्यावर करमाळा तालुक्यात मला मोठा प्रतिसाद आहे असे खोटे सांगत आहेत. करमाळा तालुक्यात आल्यावर मला ३६ गावात मोठी आघाडी मिळणार; असे सांगत आहेत. परंतु वस्तुस्थिती पाहिली तर दोन्ही भागातील जनतेने संजयमामा यांना नाकारल्याचे दिसून येते. मतदार संघात अशी अवस्था असताना राज्यपातळीवर फारसे वेगळे चित्र नाही. राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांनाही फसविण्याचे काम विद्यमान आमदार यांनी केल्याने आता उमेदवारी मागताना महाविकास आघाडी व महायुती या दोघांनीही दारे बंद केली आहेत. यामुळे आमदार शिंदे यांचेवर अपक्ष उभारण्याची वेळ आली आहे. करमाळा मतदार संघात कधी तरी अवसे पौर्णिमेच्या दिवशी येणारा हा दोन्ही घरचा पाहुणा निवडणुकीत मतांच्या बाबतीत उपाशीच राहणार असून महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील हे २० हजाराहून अधिक मताधिक्य घेऊन विजयी होतील; असा आत्मविश्वासही पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी व्यक्त केला आहे.

# राजेंद्रसिंह राजेभोसले यांचेसह असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



करमाळा(सं.प्र.): वीट येथे जिल्हा दूध संघाचे माजी संचालक राजेंद्रसिंह राजेभोसले यांनी असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी राजेभोसले म्हणाले, की गेल्या पाच वर्षात विकासापासून वंचित असलेल्या वीट परिसराचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आता नारायण पाटील यांना आमदार करणे ही काळाची गरज आहे. यामुळेच कार्यकर्त्यांच्या संमतीने मी हा प्रवेश केला असून भविष्यात नारायण पाटील यांचेबरोबर सर्वांना घेऊन गाव आणि परिसराचा विकास साधणार; असे सांगितले.

यावेळी अभयसिंह राजेभोसले, दिगंबर गाडे, तात्यासाहेब जाधव, अंकुश जाधव, विशाल गणगे, दिगंबर राऊत, धोंडिबा जाधव, गौतम जाधव, सतीश निंबाळकर, विशाल कांबळे, श्रीकांत जाधव, आबा सुर्वे, कांतीलाल काळे, बाळू माळी, पांडूरंग जाधव, शांतीलाल जाधव, समाधान राऊत, प्रल्हाद जाधव, गोवर्धन जाधव, अनिल ढेरे, हनुमंत ढेरे, वसंत गणगे, प्रकाश पठाडे, प्रकाश ढेरे, आबा पवार, जालिंदर जाधव, रविंद्र भोसले, प्रकाश काळे, कृष्णा ढेरे, उद्योजक जगदीश निंबाळकर, महादेव आढाळे, सुनील धाकतोडे, प्रा.आप्पासाहेब जाधव यांनी प्रवेश केला.

# दिग्विजय बागल यांच्या करमाळा शहर मधील पदयात्रेला उस्फुर्त प्रतिसाद






करमाळा(सं.प्र.) : शिवसेना व महायुतीचे उमेदवार दिग्विजय दिगंबरराव बागल यांच्या करमाळा शहरातील पदयात्रेस नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

करमाळा शहर मधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शहरातील अंतर्गत रस्ते, उपजिल्हा रूग्णालयाची दुरावस्था, शहरातील स्वच्छता या मुलभूत प्रश्नांकडे गेली दहा वर्षे करमाळेकरांनी संधी दिलेल्या लोकप्रतिनिधीने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याची भावना नागरीकांनी या पदयात्रे दरम्यान व्यक्त केल्या. नुकत्याच झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करमाळा शहर पाणी प्रश्न, उपजिल्हा रूग्णालय व वैद्यकिय सेवा या सोडविण्यासाठी आम्ही दिग्विजय बागल यांना पूर्ण ताकद देऊ; असा विश्वास दिला होता. त्यामुळे नागरीकांना आता मुख्यमंत्री, महायुती व दिग्विजय बागल व बागल कुटूंब यांचेकडून आशा आहेत. या पदयात्रेत भाजपा प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे, माजी नगरसेवक किरण बोकन, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण, सचिन घोलप, विजय लावंड, संजय घोरपडे, ॲड.शिंगाडे तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विरोधकांच्या भुलथापांना बळी पडू नका : चंद्रकांत सरडे




करमाळा(सं.प्र.): २०१९ ते २०२४ या पंचवार्षिक मध्ये आमदार संजयमामा शिंदे यांनी केलेल्या विकासकामामुळे विरोधक भांबावून गेलेले आहेत. विधानसभेची निवडणूक विकास–कामांचा मुद्दा सोडून भरकटवली जात आहे. मामांनी दिलेल्या ३४९० कोटीच्या विकास–कामांची चेष्टा उडवणे व अतिशय खालच्या पातळीवर जाऊन टिका करणे हे गलिच्छ राजकारण विरोधकांनी सुरू केले असून आ.शिंदे गटाचे प्रमुख कार्यकर्ते गट सोडणार आहे; अशा वावड्या उठवून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम विरोधक करत आहेत. विरोधकांच्या भुलथापांना अजिबात बळी पडू नका; असे प्रतिपादन चिखलठाणचे माजी सरपंच चंद्रकांत सरडे यांनी केले. याबाबत ते म्हणाले, की जेऊर – चिखलठाण – कुगाव या १६ किलोमीटरच्या रस्त्यासाठी १६ कोटी रूपये मंजूर करून एक महिन्यात रस्ता पूर्ण केल्यामुळे तसेच कुगाव ते शिरसोडी या नदीवरच्या पुलासाठी ३९५ कोटी निधी मंजूर करून सदर कामाचे भुमीपूजन करून काम चालू झालेले आहे. त्यामुळे आमच्या भागातील शेतकरी वर्ग मामांच्या कार्यपध्दतीवर खुश आहे. करमाळा तालुका सुजलाम सुफलाम करण्यासाठी आमदार शिंदे यांच्या नेतृत्वाची तालुक्याला गरज आहे. संजयमामा यांना परत एकदा निवडून आणण्यासाठी जिवाच रानं करून चिखलठाण परिसरातून मोठे मताधिक्य मिळवून देणार ; असेही सरडे यांनी सांगितले.




मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

श्री गजानन अगरबत्ती

• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

पुनम एजन्सी

अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
• प्लंबींग • हार्डवेअर
होलसेल व रिटेल
योग्य दरात मिळेल


# शिवसेना महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांना विजयी करा - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




करमाळा(सं.प्र.) : शिवसेना भाजपा महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांना विजयी करून महायुतीला साथ द्या. करमाळा तालुक्याचे सर्व प्रश्न मार्गी लावून सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू; असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

करमाळा येथे विधानसभा निवडणुकीतील शिवसेना महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल, माजी आमदार शामलताई बागल, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, मंगेश चिवटे, सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत, जिल्हाप्रमुख महेश चिवटे, आदिनाथ कारखान्याचे माजी उपाध्यक्ष रमेश कांबळे, माजी अध्यक्ष धनंजय डोंगरे, मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, बाळासाहेब पांढरे, नानासाहेब लोकरे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, युवा प्रदेश सरचिटणीस दिपक चव्हाण, जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकूर, संजय घोरपडे, जितेश कटारिया, रिपाइंचे अर्जुनराव गाडे, बाळासाहेब टकले, युवा सेना जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे, महिला तालुकाप्रमुख प्रियंका गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की दिग्विजय बागल हे शिवसेना भाजपा महायुतीकडून उभे असून त्यांच्या नावात विजय आहे. त्यांचा विजय निश्चित असून शिवसेना महायुती घटक पक्षांनी दिग्विजय बागल यांना बहुमताने निवडून देऊन आमदार म्हणून काम करण्याची संधी द्यावी. दिग्विजय तू चिंता करू नको, एकनाथ शिंदे तुझ्या पाठीशी आहे. मी ज्यावेळी एखाद्याला ताकद देतो तो पूर्ण व कायम देतो. त्यामुळे करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसासिंचन योजना, एमआयडीसी, आदी प्रश्न सोडवू तसेच आदिनाथ कारखाना, मकाई कारखान्यास आर्थिक मदत करून सर्व प्रश्न मार्गी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. करमाळा तालुक्यामध्ये आरोग्याच्या बाबतीतही आम्ही अत्याधुनिक पध्दतीचे सर्वसोयीनेयुक्त हॉस्पिटल उभा करणार आहोत. करमाळा माढा मतदारसंघातील ३६ गावामधील मायमाऊलीचा लाडकी बहिणींचा आशिर्वाद दिग्विजय बागल यांच्या पाठीशी आहे. महाविकास आघाडीने लाडकी बहिण योजनेचा खोटा प्रचार करून खोटे नरेटिव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसभेत त्यांना त्याचा फायदा झाला. परंतु आता जनता हुशार झाली असून त्यांना हे समजले आहे, की हा खोटा नरेटीव होता म्हणून त्यांनीच आता लाडक्या बहिणीसाठी आम्ही सत्तेत आल्यानंतर २१०० रूपये देणार असल्याचे जाहीर केले. एकीकडे १५०० रूपये देऊन सरकारी तिजोरीवर ४६ हजार कोटीचा बोजा पडत असल्याचे ते सांगत होते. मग ते ९२ हजार कोटी रूपये कुठून आणणार हे आता सर्वसामान्य जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे आता जनता त्यांच्या भुलथापांना बळी पडणार नाही. सर्वसामान्य जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी, युवकांसाठी, महिलांसाठी आम्ही जी कामे केली आहेत. त्याची जाण ठेवून सर्वांनी विचार करून धनुष्यबाणाचे बटन दाबून शिवसेनेच्या उमेदवाराला विजयी करावे. आम्ही सत्तेत आल्यानंतर लाडकी बहिण योजना बंद होणार नाही तर दीड हजार ऐवजी २१०० रूपये देण्यात येणार आहे. अंगणवाडी शिक्षकांचा पगार १५ हजार रू. करण्यात येणार आहे. गोरगरीब सर्वसामान्य जनतेचे हित जपणारे महायुतीचे सरकार असून राज्यात महायुतीचा विजय निश्चित असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

दिग्विजय बागल यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, की दिगंबरराव बागल मामाचा मुलगा म्हणून मला एकवेळ आमदार म्हणून आपण आशिर्वाद द्यावा. स्व.मामांच्या निधनानंतर अठरा वर्षानी त्यांचा मुलगा म्हणून एकदाच मी तुम्हाला मत रूपी आशिर्वाद मागत आहे. एक वेळ मला आमदार म्हणून निवडून द्या, करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकास करून दिलेल्या संधीचे सोने नक्कीच करून दाखवीन; असाही विश्वास दिग्विजय बागल यांनी व्यक्त केला.

या जाहीर सभेसाठी शेतकरी, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंदू मुस्लिम महिलांनी लाडकी बहिण योजने बद्दल कृतज्ञता व्यक्त करत लाडका भाऊराया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे औक्षण केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शेखर जोगळेकर यांनी केले.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# पेन्शन फाईल व मेडिकल बीलाची पूर्तता करा
## वंदना बापू चव्हाण यांची मागणी

करमाळा(सं.प्र.): येथील महात्मा गांधी विद्यालयात शिपाई म्हणून कार्यरत असलेले कै.बापू नामदेव चव्हाण यांच्या फॅमिली पेन्शन निवड श्रेणी प्रस्ताव व मेडिकल क्लेमची पूर्तता करण्यात यावी अन्यथा मला शिक्षणाधिकारी कार्यालय सोलापूर यांचे समोर उपोषण करावे लागेल; असा इशारा श्रीमती वंदना बापू चव्हाण यांनी लेखी निवेदनाव्दारे दिला आहे. याबाबत श्रीमती चव्हाण यांनी गांधी विद्यालयाच्या मुख्याध्यापकास लेखी निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी वरीलप्रमाणे मागणी केली आहे. यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या पतीच्या कर्जाची सर्व रक्कम भरण्यास सांगितल्यानंतर ती सर्व रक्कम भरूनही फॅमिली पेन्शनची कागदपत्रे दिले जात नाहीत. हा माझ्यावर अन्याय असून तो अन्याय दूर करावा; अशीही त्यात मागणी केली आहे.

# ८४ वर्षाच्या लुणा चालकास अज्ञात वाहनाची धडक - लुणाचालकाचा मृत्यू

करमाळा : ८४ वर्षाच्या लुणा चालकास अज्ञात वाहनाने धडक देऊन झालेल्या अपघातात लुणा चालक वसंत रंगनाथ वीर (वय-८४, रा.पांडे) यांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात २ नोव्हेंबर सकाळी साडेआठच्या सुमारास पांडे येथे रस्त्यालगत झाला आहे. या प्रकरणी लक्ष्मी वसंत वीर (वय-७०, रा.पांडे) या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २ नोव्हेंबरला सकाळी साडेआठ वाजता मी व माझे पती वसंत रंगराव वीर असे आम्ही आमच्या लुणावर बसून शेतात जात होतो. रोडच्या कडेला गाडी उभा करून आम्ही शेतात जात असताना अज्ञात चारचाकी वाहनाने आम्हा दोघास धडक दिली. त्यात माझ्या पतीच्या डोक्यास मार लागून त्यांचा मृत्यू झाला आहे.

नायब तहसीलदार



आशिर्वाद



श्री.कांतीलाल रंगनाथ रोकडे
(मा.संचालक, आ.सह.सा.कारखाना)

सालसे येथील
श्री.प्रितम जालिंदर पवार
यांची निरीक्षण अधिकारी
(नायब तहसीलदार पुरवठा) पदी
नियुक्ती झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन..!

शुभेच्छुक
● जालिंदर जनार्दन पवार (मा.मुख्याध्यापक), सौ.मीरा जालिंदर पवार, शुभम जालिंदर पवार
● अर्जुन उध्दव तकीक (सामाजिक कार्यकर्ते, वांगी नं.३)
● हनुमंत रामभाऊ रोकडे (सरपंच, फिसरे), विजय आवताडे (मा.उपसरपंच फिसरे)
● विजय उत्तम घाडगे (पिंपरी-चिंचवड शहर पोलीस)
● संतोष राऊत (अध्यक्ष, अभिनव भारत समाजसेवा मंडळ सालसे)
● उत्तरेश्वर रामदास फाटके आणि परिवार (कोंढेज)
● सुनील दौंडे (माजी सैनिक फिसरे) ● शरद पवार (गौरव कलेक्शन सालसे, साडे)
● सुधाकर रोकडे, महेश रोकडे, शहाजी रोकडे, अमृत रोकडे, पद्माकर रोकडे (फिसरे)
● नितीन काळे (सालसे) ● नितीन नुस्ते आणि परिवार(जेऊर)




सुवर्णसंधी..! सुवर्णसंधी..!! सुवर्णसंधी..!!!

**त्वरीत भरती चालू आहे**

**पाहिजेत**

श्री कमलादेवी औद्योगिक सह.वसाहत येथील आमच्या फिटवेल कंपनीत कामगारभरती चालू आहे. सदर कंपनीत पाईप होज क्लिप, नटबोल्टचे उत्पादन केले जाते. उमेदवारांनी आपल्या संपूर्ण माहिती व आधारकार्डसह खालील पत्त्यावर स्वत: भेटावे.

टीप : शिक्षणाची कोणतीही अट नाही.

पत्ता

**फिटवेल होज क्लिप प्रॉडक्टस्**

प्लॉट नं.१२, १३., श्री कमलादेवी औद्योगिक सह.वसाहत मर्या; करमाळा.
मो.9881723717, 9423337547

## वडशिवणे येथे दहा एकर क्षेत्रावरील ऊसाला अचानक लागली आग
## शेतकऱ्यांचे २५ ते ३० लाख रूपयाचे नुकसान

करमाळा(सं.प्र.) : वडशिवणे येथील १० ते १२ एकर क्षेत्रावरील आडसाली ऊसाला ८ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. यामध्ये सुमारे २५ ते ३० लाखाचे नुकसान झाले आहे. यात १२ एकर ऊस, पाईप व ड्रीपसह आगीत जळून खाक झाले.

कविटगाव रस्त्यालगत ऊसाची शेती मोठ्या प्रमाणावर आहे. बुधवारी अचानक आग लागली. ही माहिती कळताच १५० ते २०० लोकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांना काही प्रमाणात यश आले. यामुळे बाकीच्या शेतकऱ्यांचा ऊस वाचला. महादेव बाबर, विठ्ठल बाबर यांच्या शेतामधून एल.टी. लाईन गेली आहे. तारेचे स्पार्कींग होऊन याच्या ठिणग्या ऊसामध्ये पडल्या यामुळे ही आग लागली अशी माहिती बाळासाहेब वणवे यांनी दिली. याची माहिती मिळताच तलाठी राजाभाऊ आदलिंगे, कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर सरडे यांनी भेट देऊन पाहणी केली. यामध्ये अंदाजे २५ ते ३० लाखाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी; अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

करमाळा विधानसभा मतदार संघ

## विनोद सितापुरे यांचा प्रचार सुरू

**तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी विजयी करण्याचे आवाहन**



करमाळा : करमाळा विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार विनोद दिलीप सितापुरे (दाळवाले) यांच्या प्रचारास प्रारंभ झाला आहे. निवडणुक आयोगाने त्यांना 'बासरी' हे चिन्ह दिले असून **श्रीकृष्णाची बासरी** घेऊनच आपण मंत्रालयात जावू; अशी त्यांची घोषणा आहे.

निवडणुकीच्या जाहीरनाम्यात त्यांनी करमाळा तालुक्यात बारामती पॅटर्न राबविणार, विकासाची गंगा आणणार, जेऊर रेल्वेस्थानकावर सर्व गाड्यांना थांबा देण्याचा प्रयत्न करणार, शहर व तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणार, रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावणार, अशाप्रकारे तालुक्यात विविध विकासकामे करणार असल्याचे विनोद सितापुरे यांनी सांगितले.

करमाळा तालुक्याचा विकास हाच आपला ध्यास असून, मतदारांनी येत्या २० तारखेला **बासरी** चिन्हा समोरील बटन दाबून आपणांस प्रचंड मताधिक्याने निवडून द्यावे; अशी विनंती विनोद सितापुरे यांनी प्रचार दरम्यान मतदारांना केले आहे.



२४४, करमाळा-माढा विधानसभा निवडणूक २०२४

**अपक्ष उमेदवार**

**विनोद दिलीप सितापुरे**

**बासरी**

**वचननामा**

- बारामती पॅटर्न राबवणार.
- विकासाची गंगा आणणार.
- जेऊर रेल्वे स्टेशनला सर्व गाड्यांना थांबा देण्याचा प्रयत्न करणार.
- करमाळा तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावणार.
- ऊसाला योग्य हमी भाव मिळवून देवून ऊसाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरीत जमा करण्यासाठी प्रयत्न करणार.
- शेतकऱ्यांच्या मालाला भाव देणार.
- रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावणार.

**"एकच ध्यास करमाळा तालुक्याचा विकास"**

२० तारखेला मतदार बंधू भगिणींनो, **'बासरी' चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विजयी करावे** आणि आपल्या मतदार संघाला सुजलाम, सुफलाम बनवण्याची संधी द्यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | विनोद दिलीप सितापुरे (दाळवाले) | बासरी | |

प्रकाशक : विजय दिलीप सितापुरे, करमाळा.

### करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी

# आमदार म्हणून निवडून देऊन काम करण्याची संधी द्यावी : प्रा.रामदास झोळ

करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असून, सत्तेसाठी पैशासाठी नाही तर शिक्षण, आरोग्य, उद्योग, रोजगार निर्मिती, विकासासाठी भुमिपुत्र म्हणून मला एक वेळ आमदार म्हणून निवडून देऊन काम करण्याची संधी द्यावी; असे आवाहन करमाळा विधानसभेचे अपक्ष उमेदवार प्रा.रामदास झोळ यांनी केले.



करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथील जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर बहुजन शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ मंगवडे, काँग्रेस ओबीसी तालुका अध्यक्ष गफूर शेख, मधुकर झोळ, अनुरथ झोळ, पांडूरंग झोल, लालासाहेब जगताप, दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिव मायाताई झोळ, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र गोडगे, गणेश मंगवडे, तालुका अध्यक्ष सुदर्शन शेळके, रिपाइंचे यशवंतराव गायकवाड, सत्यवान गायकवाड, सुहास काळे-पाटील, माजी सरपंच भगवान डोंबाळे, कल्याण खाटमोडे, श्रीकांत साखरे-पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.रामदास झोळ म्हणाले, की रस्ते, वीज, पाणी ही कामे लोकप्रतिनिधीला करावीच लागतात. परंतु याचबरोबर शिक्षण, आरोग्य, रोजगार हे प्रश्न मार्गी लावणे लोकप्रतिनिधीचे काम असते. करमाळा तालुक्यातील गावांमधील रस्ते, पाण्याबाबत प्रश्न वर्षानुवर्षे तसाच आहे. तो प्रश्न मार्गी लावणार आहे. तसेच शिक्षण व रोजगार निर्मितीसाठी देवळाली येथे शिक्षण संकुलाची निर्मिती करून विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय करणार आहे. याचबरोबर रोजगार निर्मितीसाठी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करून युवकांच्या हाताला कायमस्वरूपी काम मिळवून देणार आहे. तसेच आरोग्याच्या बाबतीतही करमाळा तालुका मागास असून सर्व सोयींनीयुक्त तज्ञ डॉक्टरांना बरोबर घेऊन प्रा.रामदास झोळ फाउंडेशनच्या वतीने मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सवलतीच्या दरामध्ये सुरु करण्याचा आपला मानस आहे.

करमाळा तालुक्यात सर्वात जास्त निधी दिला असे आमदार म्हणत आहेत आणि इकडे ३६ गावामंध्ये आल्यानंतर येथे सर्वाधिक निधी दिला अशी सांगत आहेत. परंतु सगळीकडे रस्ते, पाणी, वीज, आरोग्य याबाबतचे प्रश्न जसेच्या तसेच आहेत. मग तीन हजार कोटीचा निधी गेला कुठे ? हा प्रश्न जनतेने विचारणे गरजेचे आहे.

करमाळा, माढा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव मिळवून देण्याबरोबरच मकाई, कमलाई, भैरवनाथ या कारखान्याकडे अडकलेली ३० कोटी रूपयांची बिले आंदोलन करून आम्ही मिळवून दिली आहेत. शेतकऱ्यांच्या खिशाला एक रुपयाची झळ न लागू देता स्वत: न्यायालयीन लढाई लढून न्याय मिळवून दिला आहे. म्हैसगाव येथील विठ्ठल शुगर्स कारखाना दुसऱ्या कंपनीला चालविण्यास दिला असून या कारखान्याकडे अडकलेली बिले सभासद रक्कम मिळण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आंदोलन करून १०० कोटी रूपये त्यांना देण्यास भाग पाडले आहे. मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्या माध्यमातून सर्व घटकांना, बहुजन बांधवांना न्याय देण्यासाठी आपण पाठपुरावा करून मुलींचे शिक्षण मोफत करण्याबरोबरच ओबीसी विद्यार्थ्यांनाही इतर समाजाप्रमाणे वसतिगृह भत्ता मिळवून दिला आहे. धनगर समाजालाही एसटी आरक्षणाप्रमाणे सर्व लाभ मिळण्यासाठी जरांगे-पायील यांच्या माध्यमातून मागणी केली. तोही शासन निर्णय झाला आहे. मनोज जरांगे-पाटील हे सर्व समाजाचे कल्याण करणारे नेते असल्यामुळे त्यांचे कार्य सर्वसमावेशक असल्यामुळे आपण त्यांच्या नेतृत्वाखालील समर्थनार्थ विधानसभेची निवडणूक लढवत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

करमाळा, माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना उजनीचे पाणी मिळण्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक असून कालवा समितीमध्ये शासनाचे अधिकृत नियंत्रण असण्यासाठी आपण आग्रही आहोत. आपल्या हक्काचे पाणी आपणांस मिळाले पाहिजे, याकरीता समांतर जलवाहिनीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. तसेच करमाळा तालुक्यात केळी उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे केळी संशोधन केंद्र उभारण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. व्यावसायिक शिक्षणाची सोय करून एमआयडीसी उद्योग व्यवसाय उभारणीसाठी प्रयत्न करून स्वयंरोजगार मिळवून देणार असल्याचेही झोळ यांनी सांगितले. तसेच रिक्षा या चिन्हासमोरील बटन दाबून एक वेळ आमदार म्हणून निवडून देऊन आपल्या सेवेची संधी द्यावी; असेही आवाहन प्रा.रामदास झोळ यांनी केले.

या सभेत माजी आमदार नारायण पाटील गटातून कोंढारचिंचोलीचे भरत लांडगे, अनिल डफळे, मनोज साळुंखे, सागर गलांडे, अनिल गजरमल यांचे समवेत शंभर कार्यत्यांनी झोळ परिवारात प्रवेश केला. तसेच बागल गटातून भिलारवाडीचे परमेश्वर गिरंजे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह प्रवेश करून प्रा.रामदास झोळ यांना जाहीर पाठींबा दिला आहे. प्रास्ताविक श्रीकांत साखरे-पाटील यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा.नवले यांनी केले. उपस्थितांचे आभार रवींद्र गोडगे, ज्ञानेश्वर शिंदे यांनी मानले. या सभेला शेतकरी, युवक, महिला, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १५ नोव्हेंबर पासून श्री कमलादेवी यात्रा महोत्सवास सुरूवात - १९ नोव्हेंबरला मुख्य यात्रा




करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील श्री कमलादेवी यात्रा महोत्सवास १५ नोव्हेंबर पासून सुरूवात होणार आहे. कमलादेवीची यात्रा सलग पाच दिवस चालू असते. दररोज प्रत्येक वाहनावरून कमलादेवीची छबीना मिरवणूक दुपारी व रात्री काढण्यात येते. त्यानुसार १५ नोव्हेंबरला दुपारी गरूड व रात्री सिंह या वाहनावरून, १६ नोव्हेंबरला दुपारी छोटा नंदी व रात्री मोठा नंदी या वाहनावरून, १७ नोव्हेंबरला काळवीट व घोडा तर १८ नोव्हेंबरला मोर व लहान हत्ती या वरून छबीना मिरवणूक काढण्यात येणार आहे. १९ नोव्हेंबरला मुख्य यात्रा असून या दिवशी रात्री ११ वा. ५५ मि. सप्तमुखी घोडा पाच वाहन, मोठा हत्ती या वाहनावरून कमलादेवीची छबीना मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी फटाक्यांची आताषबाजी करण्यात येणार असून, विविध वाद्यांच्या साथीने छबीना मिरवणूक मार्गस्थ होणार आहे. राजेरावरंभा तरूण मंडळ संलग्न श्री कमलादेवी यात्रा समिती व ग्रामस्थांच्या वतीने यात्रा महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली असून या यात्रा महोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच कलगीतुरे, शाहीर, कलावंत मंडळी व करमाळा शहर तालुक्यातील सर्व गणेश मंडळाचे संघ, झांजपथक, आराधी मंडळ आदींनी हजेरी लावून यात्रेची शोभा वाढवावी; असे आवाहन श्री कमलादेवी यात्रा समितीने केले आहे.

**बागायत जमीन व बंगला विकणे आहे**

मांगी येथील साडेसात एकर बागायत जमीन
(तीन बोअर, एक विहिर, चार इंची तळ्यावरून पाईप लाईन)
तसेच सर्व सुविधायुक्त असलेला बायपास रोडलगत हायवे टच असलेला
दोन मजली बंगला योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे
**संपर्क : मो.7709350035**

**जागा विकणे आहे**

करमाळा शहरातील सुतारगल्ली येथील खुली जागा
(२० x ३२) योग्य किंमत आल्यास विकणे आहे
**संपर्क : मो.7020846820**


फायदेशीर गुंतवणूक
आजच आपल्या भविष्यासाठी गुंतवणूक करा व सोबत
टुणवाल कंपनीची इलेक्ट्रिक स्कुटर गिफ्ट मिळवा
संस्कार सिटी फेज २
धर्मसंगीत लॉन्स शेजारी, करमाळा-कर्जत रोड
किंमत 3,51,000.00/- 1000 स्क्वे.फुट पासून आजच साईट व्हीजीट करा
दसरा दिवाळी निमित्त आकर्षक ऑफर
४ एकरचा भव्य टाऊनशिप प्रकल्प
त्वरा करा मोजकेच प्लॉट शिल्लक
प्लॉट्स बुकींग सुरू आहे
● सुरूवातीला २१ प्लॉट बुकींग करणाऱ्यांस टूनवाल कंपनीची इलेक्ट्रीक स्कुटर फ्री
● अतिशय वाजवी दरामध्ये संपूर्ण वास्तुशास्त्रानूसार ७५० ते १५०० स्क्वे.फुट प्लॉट्स उपलब्ध ● क्लिअर टायटल एन.ए.प्लॉट्स । स्वतंत्र सातबारा उतारा
● प्रशस्त अंतर्गत ३० व ४० फुटी रस्ते ● अद्ययावत अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन ● स्ट्रीट लाईट्स व भव्य आकर्षक प्रवेशद्वार
● रस्त्याच्या दुतर्फी हिरवीगार झाडी ● गार्डन सभोवताली कंपाऊंड व झाडी
आतार डेव्हलपर्स
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
बुकींगसाठी संपर्क
जावेद आतार (9423334210)
मुन्नाभाई काझी (9881089582)


इंदापूर तालुक्यातील सर्वात भव्य शोरूम
गांधी सराफ & कंपनी
बारामतीकर
खास दीपावली निमित्त
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
15% डिस्काऊंट
ऑफर : दि. 20 नोव्हेंबर 2024 पर्यंत
*नियम व अटी लागू
"सगळा आनंद सगळे सौख्य,सगळ्या स्वप्नांची पूर्णता,
यशाची सगळी शिखरे,सगळे ऐश्वर्य,
हे आपल्याला मिळू दे, ही दीपावली आपल्या आयुष्याला
एक नवा उजाळा देवू दे..."
शुभ दिपावली
मेन रोड, इंदापूर, जि. पुणे | मो. नं. 9404239600/9860813001